**वादीतर्फे साक्षीदार क्र.०३**
देवाची शपथ खरे सांगतो
नाव –नत्थु बळीराम हुलके.

**<u>सरतपास शपथेवर वादी तर्फे वकील श्री टी.जी.अखंडे यांच्या मार्फत शपथेवर सुरू.</u>**

**०७.** माझे शपथपत्र नि. क्र.४२ मधील मजकूर खरा व बरोबर आहे त्यावर माझी सही आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>सर्व प्रतिवादीतर्फे वकील श्री.एस.एम.पिंपळकर यांच्यामार्फत उलटतपास शपथेवर सुरू.</u>**

**०८.** झामाजी राजाराम भुडे यांच्या नावाचा वादमिळकतीचा २२ एकराचा ७/१२ चा उतारा मी पाहिलेला नाही. माझे शपथपत्र नि.क्र.४२ मधील परिच्छेद क्र.३ मधील मजकूर 'वादी व प्रतिवादींचे वडील नामे झामाजी वल्द राजाराम भुडे यांची मौजा बेलपेठ येथे २२ एकर वडीलोपार्जित जमिन होती तथापी त्यांच्या वडीलांनी कागदोपत्री वादी उत्तम यांच्या नावाने दोन गटांमिळून पाच एकर, प्रतिवादी क्र.२ यांच्या नावाने साडेसात ऐकर व लहाण मुलगा पुरूषोत्तम यांच्या नावाने तिन गटांमिळून नऊ एकर याप्रमाणे वडीलांनी वाटणी करून ठेवली होती' हा मजकूर वाचुन दाखविण्यात आला तो खरा व बारोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी व प्रतिवादी यांच्या वडीलांनी वरिलप्रमाणे करून ठेवलेले वाटणीपत्र मी पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, २२ एकर शेती झामाजी राजाराम भुडे यांच्या नावाने होती तसेच वरिलप्रमाणे त्यांच्या मुलांमध्ये वाटणीपत्र झाले होते याबाबतचा मजकूर मी माझ्या शपथपत्रामध्ये अंदाजे लिहीलेला आहे.

**०९.** हे म्हणणे खरे आहे की, सदर वादमिळकती ह्या झामाजी राजाराम भुडे यांनी त्यांच्या मुलांमध्ये वाटुन दिल्या होत्या व त्यांचा मुलगा रघुनाथ हा संपुर्ण शेतीची वहीवाट करित होता हा मजकूर त्या वाटणीपत्रामध्ये लिहीलेला होता किवा कसे हे मला माहित नाही कारण मी वाटणीपत्रकच पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की,माझ्या शपथपत्रातील परिच्छेद क्र.३ मधील मजकूर अंदाजे लिहीलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, परिच्छेद क्र.४ मधील माझ्या शपथपत्रातील वाटणीबाबतचा मजकूर तसेच शेतमिळकती ह्या विभागणी केल्या याबाबतचा मजकूर मी वाटणीपत्रामध्ये लिहीला आहे किंवा कसे याबाबत पाहिलेले

नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर मजकूर मी अंदाजे लिहीलेला आहे. आता मला परिच्छेत क्र.४ मधील संपूर्ण मजकूर वाचुन दाखविण्यत आला त्या मजकूराबाबत मी वाटणीपत्र पाहिलेले नाही व तो मजकूर मी अंदाजे लिहीलेले आहे.

**१०.** मी वादातीत मिळकती गट क्र.४७ व ४८ च्या पुर्व पश्चिम धु–यावर असलेल्या विहीरीचे लाईटबिल पाहिलेले आहे सदर बिलावर उत्तम यांचे नाव लिहीलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर वादातीत विहीर आता गट नं. ४७ मध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी यांना सदर विहीरीवरून प्रतिवादी यांनी पाणी देण्यास मनाई केली त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी यांच्याविरूध्द तसा दावा अथवा तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, शेतवादमिळकत व हेवती गाव यामधील अंतर ४० किमी आहे.

**प्रश्न–**सदर वादातीत विहीर ही गट क्र.४७ व ४८ च्या जोडधु–याला लागुन नाही बरोबर आहे काय?

**उत्तर–**धु–याला लागुन आहे.

हे म्हणणे खरे आहे की, सदर वादातीत विहीर ही गट न.४७ च्या हद्दीमध्ये आहे.

**११.** हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले व आजरोजी खोटी साक्ष देत आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, मी ७/१२ चे उतारे पाहिले, विहीर पाहिली व कागदपत्रे पाहिली त्यावरून साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादमिळकतीचे ७/१२ चे उतारे पाहिले, विहीर पाहिली व कागदपत्रे पाहिली नाही व प्रत्यक्ष मोक्का पाहणी केली नाही व आजरोजी खोटी साक्ष देत आहे. मला उत्तम यांनी साक्ष देण्याकामी न्यायालयात आणले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला उत्तम यांनी साक्ष देण्यासाठी सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझा प्रतिवादी रघुनाथ यांच्यासोबत वाद आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर वादामुळे मी चिडुन जाउन वादीच्या बाजुने खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या.,क.स्तर,उमरेड
दि ०१.१२.२०२५

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या.,क.स्तर,उमरेड